म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. 2380
REFBK-0022524

ॐ

# ॥ श्री[illegible]यानंद लीलामृत ॥

—: लेखक :—

श्री. वासुदेव महादेव म्हसकर

किमत १ रुपया

लेखक,
श्री वासुदेव महादेव म्हसकर
विजया लक्ष्मी प्रकाशन
गणेशपुरी, जि. ठाणे.

(सर्व हक्क लेखकांचे स्वाधिन)

मुद्रक,
रमेश प्रधान,
शुभमंगल प्रि. प्रेस,
(युनियन बँक शेजारी)
एस. व्हि. रोड बोरीवली.

२३९०
काव्य
२२५२८
९१२२/७८
सांगे
भेट

## ॥ श्री नित्यानंद लीलामृत प्रारंभः ॥

REFBK-0022524
REFBK-0022524
ग्रंथ संग्रहालय ठा
2390
22528
शाखा (स्थळ

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 22528



# ॥ श्री नित्यानंद लीलामृत प्रारंभः ॥

## ॥ अध्याय पहिला ॥

ॐ नमोजी गणनायका । विघ्नांतक विघ्नहरा ॥
सिद्धिबुद्धिच्या दातारा । प्रथम तुज नमितसे ॥ १ ॥
ऋद्धिसिद्धि गणपती । प्रथम पूजिलें मानसीं ॥
स्थिर व्हावी माझी मति । नित्यानंद लीलामृत रचिण्या ॥ २ ॥
आतां वंदू ब्रह्मकुमारी । सकल विद्यांची स्वामिनी ।
वीणा करधारिणी । वाक् वरदायिनी सरस्वती ॥ ३ ॥
तुम्ही वरदहस्त ठेवितां । भक्ता होई सुबोधता ।
हृदयीं स्थिरावें आतां । ग्रंथ पूर्ण होईतोपरी ॥ ४ ॥
ऋद्धिसिद्धि गणपति । विद्यादेवी सरस्वति ।
काव्य सुमनें गोमटी, । चरणावरी अर्पितसे ॥ ५ ॥
आतां वंदू कुलदेवता । जोगेश्वरी दुर्गा माता ॥

चरणावरी ठेवितां माथा । अभय वरदान देतसे ॥ ६ ॥
आमुचे कुळींची स्वामिनी । सुख संपत्तिची खाणी ॥
ग्रंथ रचिण्या माझी वाणी । प्रासादिक करावी ॥ ७ ॥
तुझें स्मरण करुनी येथ । वारंवार करितो दंडवत ॥
तूंच आमुचे कुळींची माता । लेकुरां प्रेमें सांभाळी ॥ ८ ॥
गोमांतक साखळी ग्रमांत । वसती केली मठात ॥
उपनामें म्हसकर ख्यात । महादेव पिता असे ॥ ९ ॥
माता जानकी माऊली । नित्य कृपेची साऊली ॥
दत्त उपासना केली भली । म्हणुनी गुरुमुखें बोलिला ॥ १० ॥
त्या महादेवाचा सुत । वासुदेव नामें ज्ञात ॥
श्रीनित्यानंदाच्या पुरांत । गुरुचरणीं राहिला ॥ ११ ॥
स्नान घडतां उष्ण कुंडाचें । जळे पातक जन्माचें ॥
दर्शन स्वामी चरणांचें । नित्य आदरें घेतसे ॥ १२ ॥
विचार करुनी मानसीं । रचावें स्वामी चरित्रासी ।
नित्यानंद कृपा जाहली तैशी । ग्रंथ रचना करीतसें ॥ १३ ॥
व्यासें लिहिलें महाभारत । लिहिण्या बैसला विनायक ॥
तैसें नित्यानंद लीलामृत । श्रीदत्त कृपें लिहितसे ॥ १४ ॥

आतां श्रीगुरु दत्तात्रयाचें । स्मरण श्रीगुरु चरणांचें ॥
अनुसुया अत्रि पुत्राचें । नित्य स्मरण करितसे ॥ १५ ॥
महाराष्ट्र देशा प्रती । दत्त उपासनेची ख्याती ॥
कलौ श्रीपाद वल्लभः उक्ती । दत्तावतार जाहले ॥ १६ ॥
प्रथम श्रीपाद अवतार श्रेष्ठ । पीठापूर केलें पवित्र ॥
श्रीवल्लभ द्वितीयावतार । त्यानंतर नृसिंहसरस्वती ॥ १७ ॥
यांची जाहली बहु ख्याती । गाणगापुरीं केली वसती ॥
क्षेत्र जाहलें प्रख्याती । निर्गुण पादुका असती तिथें ॥ १८ ॥
आतां लिहिलें चरित्र रसाळ । नृसिंहसरस्वती दत्तदयाळ ॥
करंजापूर जन्मस्थळ । अलौकिक लीला दाविली ॥ १९ ॥
माधव विप्र करंजापुरीं । अंबा नामें त्याची नारी ॥
नृसिंहसरस्वती त्याचे उदरीं । प्रत्यक्ष दत्त अवतरले ॥ २० ॥
सप्त वर्षा पर्यंत । बाळ मुका राहिला घरांत ॥
माता पित्याशीं चिंता बहुत । काय दुर्भाग्य आमुचें ॥ २१ ॥
करिता मौंजी बंधनाशीं । चमत्कार दाविला तयांशी ॥
चतुर्वेद श्रीमुखेशीं । वदतां आश्चर्य जाहलें ॥ २२ ॥
जन म्हणती हा नव्हे बाळ । साक्षात् असे दत्तदयाळ ॥

मानव रूप धरुनी केवळ । जगदोद्धारा अवतरले ॥ २३ ॥
माता पित्या ज्ञानदेती । पुत्र दिधले तयांप्रती ॥
काशीपुरीं संन्यास घेती । यात्रेप्रती निघाले ॥ २४ ॥
माता पित्यातें करंजपुरीं । भेटुनी येती गोदातीरीं ॥
कुक्षी व्यथेच्या विप्रावरी । कृपा केली तयेंवेळीं ॥ २५ ॥
ब्राह्मणा शिकविली गुरुभक्ति । आणि देती ज्ञानशक्ति ॥
श्रीगुरु आले भिलवडी प्रती । भुवनेश्वरी सन्निध ॥ २६ ॥
भुवनेश्वरीला मूर्ख ब्राह्मण । जिव्हा छेदोनी करी अर्पण ॥
त्यास श्रीगुरुनी विद्या देऊन । धन्य केला गुरुकृपे ॥ २७ ॥
घेवडा उपटुनी दरिद्रियाचा । कुंभ दिधला हेमाचा ॥
वर्णितां प्रताप श्रीगुरुचा । दुःख दैन्य हरतसे ॥ २८ ॥
औदुंबर क्षेत्रासी राहून । योगिनीस देऊनी वरदान ॥
गाणगापुर क्षेत्र महान । गुरुरूपें जाहले ॥ २९ ॥
एका स्त्रीचा समंध दवडून । पुत्र दिधले तिजला दोन ॥
एक मरतां कथिती ज्ञान । सिद्धरूपें प्रगटुनी ॥ ३० ॥
भिक्षा दरिद्याघरीं घेती । त्यांची वंध्या महिषी होती ॥
तीस करुनी दुग्धवती । आशिर्वाद दिधला ॥ ३१ ॥

भेटो जाती त्रिविक्रमा । दाविती विश्वरुप महिमा ॥
विप्र लागे गुरुपाद पद्मा । गुरुचरणीं नमियेला ॥ ३२ ॥
म्लेंच्छापुढे वेद म्हणती । विप्र त्रिविक्रमा छळती ॥
त्यानां घेऊनी सांगाती । गुरुपाशीं आला गाणगापुरीं ॥ ३३ ॥
सद्‌गुरु तया ब्राह्मणासी । सांगती वेद रचनेसी ॥
त्यागा म्हणती वादकल्पनेसी । परी ते नायकती उन्मत्त ॥ ३४ ॥
आणुनी गांविच्या पतिता । विप्रासी वेदवाद करिता ॥
कुंठित होऊनी शापग्रस्ता । ब्रह्मराक्षस त्यां केलें ॥ ३५ ॥
एका स्त्रियेचा पति मरतां । स्त्री बहुकरी आकांता ॥
तीस श्रीगुरु नाना कथा । कथुनी शांतवू पाहती । ।३६ ॥
सहगमनासी निघतां सती । गुरुसी झाली नमस्कारिती ॥
आशिर्वाद देऊनी तिचा पति । सजिव केला चमत्कारें ॥ ३७ ॥
भास्कर नामक एक ब्राह्मण । तिघा पुरतें शिजवी अन्न ॥
जेविले बहुत ब्राह्मण । आणिक गांवचे शूद्रादी ॥ ३८ ॥
साठ वर्षांच्या वंध्येसी । दिधली पुत्र संततीसी ॥
नाना चमत्कार गाणगापुरासी । नरसिंहसरस्वती दाविती ॥ ३९ ॥
नरहरीं दिलें शुष्ककाष्ठासी । दवडिलें त्याच्या कुष्ठासी ॥

शुष्ककाष्ठीं येता पल्लवासी । कुष्ठविरहीत जाहला ॥ ४० ॥
एक कुष्ठी ब्राह्मण । आला तुळजापुराहून ॥
त्यास करवुनी संगमी स्नान । कुष्ठ हरुनी ज्ञानी केला ॥ ४१ ॥
कल्लेश्वर हिपरगे ग्रामास । श्रीगुरु भेटती नरहरीस ॥
आपुला शिष्य करवुनी त्यास । गुरुसेवे रत केला ॥ ४२ ॥
येतां दिपवाळी सण । गुरुसी आमंत्रिती सातजण ॥
तितुकीं रूपें धरुनी आपण । गेलें मठींही राहिले ॥ ४३ ॥
गुरुसाक्षात् दत्त राणा । ब्रह्मा विष्णू महेश जाणा ।
अनेकरूपी दाविल्या खुणा । जगोद्धाराप्रती प्रगटले ॥ ४४ ॥
म्लेंच्छाचा स्फोटक दवाडिती ! भक्तिस्तव नगरा जाती ॥
पुढें श्रीपर्वतीं भेटा म्हणती । शैल्य पर्वतीं निघाले ॥ ४५ ॥
अनेक लोक नाना यातीं । येती गुरुदर्शना प्रती ।
देखुनिया क्षितीं पापवृत्ती । म्हणती गुप्त रहावें ॥ ४६ ॥
ऐसा करुनी निर्धार । शिष्यासी सांगती गुरुवर ॥
आजी आम्ही जाऊं पर्वतावर । मल्लिकार्जुन यात्रेसी ॥ ४७ ॥
ऐसें ऐकुनी भक्त जन । मनीं होती उद्विग्न ॥
शोक करिती आक्रंदून । श्रीगुरुचरणीं लोळती ॥ ४८ ॥
इतुकें पाहुनी गुरुमूर्ति । प्रेमें तयां कुरवाळीती ॥

मद्‌भजनी धरा आसक्ती । मठाधामीं राहोनिया ॥ ४९ ॥
ऐसें बोधुनी शिष्यासी । गुरु गेले कर्दळी वनासी ॥
नाविक मुखें सांगुनी गोष्टीसी । निजानंदी निमग्न होती ॥ ५० ॥
ऐसी अपार चरित्रलीला । श्रीगुरु करिती गाणगापुराला ॥
निर्गुण पादुका त्या स्थळाला । भक्त आदरें पूजिती ॥ ५१ ॥
तृतीय अवतार नृसिंहसरस्वती । गाणगापुरीं जाहली ख्याती ॥
भक्त जगदोद्धारा प्रती । तया स्थानीं प्रगटले ॥ ५२ ॥
ऐसें रसाळ चरित्र । संक्षिप्तरूपें लिहिलें येथ ॥
आंतां पुढें माणिक प्रभु । माणिकपुरीं प्रगटती ॥ ५३ ॥
त्यानंतर अक्कलकोट स्वामी । साईबाबा शिरडी ग्रामीं ॥
अवतार घेती विविधनामीं । दत्तप्रभु साक्षात् ॥ ५४ ॥
पुढील अध्यायीं दत्तमूर्ति । अवतरले केरळ प्रांतीं ॥
जगदोद्धार करावयाप्रती । गणेशपुरीं प्रगटले ॥ ५५ ॥
ऐसी पुण्यपावन कथा । लिहिण्या लीलामृत ग्रंथा ॥
श्री नित्यानंद चरणीं मस्तक ठेवितां । गुरुकृपा करितसे ॥ ५६ ॥

॥ इति श्री नित्यानंद लीलामृते प्रथम अध्याय समाप्तः ॥

॥ ओवी संख्या ॥ ५६ ॥

# ॥ अध्याय दुसरा ॥

ॐ नमो सद्गुरु नित्यानंदा । आनंदा कंदा गोविंदा ॥
निर्गुणाकार भक्तवरदा । आरंभी नमितो तुला ॥ १ ॥
आतां लिहिण्या तुझी कथा । ममहृदयीं स्थिरावें आतां ॥
मी बालक अल्पमति असता । कैसें वर्णन करूं शके ॥ २ ॥
नित्यानंद चरित्र सागर । आंत असे अमृत थोर ॥
शोधितां सांपडे थोडे फार । लीलामृतीं सांठविलें असे ॥ ३ ॥
निर्गुण अवतार जाहला । ब्रह्मानंदी निमग्न झाला ॥
जो जैसा पाहे त्याला । सगुणरूपीं दिसतसे ॥ ४ ॥
कोणी म्हणती आहे दत्त । नाथपंथाची परंपरा होत ॥
गणेशपुर केलें प्रख्यात । भक्त जनांसी तारिलें ॥ ५ ॥
होते निर्गुण उपासका । नव्हतें दैवत कोणी एक ॥
ब्रह्मसाक्षात्कारी तारक । शांत धीरोदात्त असे ॥ ६ ॥
वर्णूं जातां त्यांची कथा । बुद्धिसी यावी स्थिरता ॥
लीलामृत रचिण्या माथा । सद्गुरुचरणांवरी ठेविला ॥ ७ ॥

तुझे चरण स्पर्श करितां । कृपा दृष्टीनें पाहसी आतां ॥
द्यावी बुद्धि शक्ति आतां । अभयदान मागतो मी ॥ ८ ॥
आहे अवतार अनुपम । उपमा देणारे मूर्ख जाण ॥
जयाचे मनीं जैशी खूण । तैसा तया दिसतसे ॥ ९ ॥
आमुचें आराध्य दैवत । साक्षात् दत्तात्रय होत ॥
आम्हांलागीं ऐसें दिसत । नित्यानंद दत्त अवतरले ॥ १० ॥
आतां रचावें चरित्र महान । नित्यानंद आनंदघन ॥
वर्षतां भूमि पुण्यपावन । तैसें गणेशपुर केलें ॥ ११ ॥
गणेशपुरी आहे पंढरी । नित्यानंद नामाची वाजे टाळी ॥
भक्तजन वेळोवेळीं । सद्भक्तीनें नाम घेती ॥ १२ ॥
वर्णन करण्या जन्मकथा । मी बालक अल्प वृथा ।
प्रयत्न करी लिहिण्या गाथा । दासावरी कृपा करी ॥ १३ ॥
साधुचें कुळ शोधितां । नाहीं मार्ग दिसे निश्चिता ।
माता पिता जन्मदाता । दुसरी खूण कांही नसे ॥ १४ ॥
यापूर्वी जाहले दत्तावतार । एकाएकीं प्रगटले भूवर ॥
आपोआप जन्मले म्हणणार । महामूर्ख असती जाणा ॥ १५ ॥
अक्कलकोटस्वामी साईबाबाप्रती । एकाएकीं प्रगटले म्हणती ॥

परंतु भूमिवरी निश्चिती । मातें उदरीं जन्म होतसे ॥ १६ ॥
वृक्षासी असते मूळ । साधूसी असते कूळ ॥
मातेवीण मूल । कदापी जन्म न घेई ॥ १७ ॥
अवतार होण्या भूवरती । आवश्य असते पराभक्ति ॥
शुद्ध सात्विक सती उदरीं । ईश्वर अवतार घेतसे ॥ १८ ॥
खरोखरी पुण्य पावन । धन्य धन्य त्यांचें जीवन ॥
ज्यांचे उदरीं नित्यानंद महान । पुण्य पुरुष जन्मले ॥ १९ ॥
एकोणीसाव्या शतकारंभी । नित्यानंद जन्मले अवनीं ॥
केरळप्रांताभीतरीं । तयांचे जन्मस्थळ असे ॥ २० ॥
जन्मजात सिद्ध योगी । नाही लोभी पूर्ण त्यागी ॥
परब्रह्माचा अनुरागी । वृत्ती लीन परमेश्वरीं ॥ २१ ॥
बालपणापासुनी जाणा । वनीं करी तपानुष्ठाना ॥
एकान्त आवडे मनीं जाणा । जागोजागीं हिंडतसे ॥ २२ ॥
वृत्ति होती उदास । नसे अन्नवस्त्रांची आस ॥
ईश्वर प्राप्तीचा ध्यास । मनी लागला असे ॥ २३ ॥
बालपणीं सोडून जन्मभूमी । संचरले वनोवनीं ॥
ध्यान धारणा योगसाधनीं । एकान्त स्थळीं वैसतसे ॥ २४ ॥

महाराष्ट्र केरळ उत्तर प्रांत । संचरले हिमालयांत ॥
कांचनगडीं करूनी घोरव्रत । साक्षात्कारी जाहले ॥ २५ ॥
अंगी वस्त्र लंगोटी । कधीं कधीं नग्नही फिरती ॥
वस्त्रप्रावरणांची नसे खंती । ब्रह्मानंदी विनटला ॥ २६ ॥
संचरे साक्षात् अवधूत । मनीं एक ध्यास होत ।
जगत्कल्याणाचा हेत । तयालागीं हिंडतसे ॥ २७ ॥
वरीवरी दावी पिशाच्चवृत्ती । परी अंतरी माया होती ॥
जया मनीं जैशी भक्ति । तैसा तया अनुभव दिला ॥ २८ ॥
कोणती काहीं नसे आस । जनांपासुनी अलिप्त वास ॥
देहीं असोनी निराभास । चिन्मयरूपी दिसतसे ॥ २९ ॥
अहोरात्र संचार करिती । एके ठायीं स्थिर नसती ॥
सहज चमत्कार दाविती । योगी सिद्ध विदेही ॥ ३० ॥
शुकासारखी वैराग्य वृत्ती । बालगोपाळावरी प्रीति ॥
बालांचे संगती खेळती । जैसा गोविंद गोकुळीं ॥ ३१ ॥
आसेतु हिमाचल । संचारकेला भूमीवर ॥
जैसे नरसिंहसरस्वती थोर । महाराष्ट्रीं संचरले ॥ ३२ ॥
जेथें लागले नित्यानंद चरण । त्या भूमिचें होतें ऋण ॥

धन्य धन्य तेची जन । जया सन्निध गुरु होते ॥ ३३ ॥
कोणासी नव्हती कल्पना । बाबा साक्षात् ईश्वर जाणा ॥
मनोमनीं विकल्प कल्पना । नाना प्रकारें छळताती ॥ ३४ ॥
अंगी येण्या देवपण । सोसावे टाकीचें घण ॥
त्रास देणारे मूर्ख जाण । नरकाचे सोबती होती ॥ ३५
ज्ञानेश्वर तुकारामा प्रती । अनेक जन निंदिती ॥
परंतु संताची कीर्ति । भूमंडळीं अमर असे ॥ ३६ ॥
कांचनगडी राहून । स्वामी करती तपानुष्ठान ॥
गुंफा रचिल्या आपण । एकांत स्थळ पाहुनी ॥ ३७ ॥
तया स्थानीं केलें तप । भूमिचे पालटले रूप ॥
जनानंदस्वामी गुरुसेवक । तया स्थानीं बसविले ॥ ३८ ॥
आतां वर्णू चरित्र लीला । बाबा संचरती त्या स्थळाला ॥
सहजपणें चमत्कार केला । परी गुप्त राहिले ॥ ३९ ॥
फिरत असतां मंगळूरांत । पोलीस ठेवित तुरुंगांत ॥
म्हणती वेडा फिरे रस्त्यांत । कारागृहीं ठेविला ॥ ४० ॥
परंतु आश्चर्य होत । पुन्हा दिसती मार्गांत ॥
गावाच्या दुसऱ्या भागांत । जन तयांसी देखती ॥ ४१ ॥

म्हणती पळाला तुरुंगातून । पाहूं जाता तेथें जाण ॥
कारागृहीं पाहातां जाण । तया स्थानी होतेची ॥ ४२ ॥
हा नाहीं केवळ मानवरूप । सर्वाठायीं याचे स्वरूप ॥
जगोद्धाराचा मनीं हेत । म्हणुनी भूमी संचरती ॥ ४३ ॥
आतां पुढील अध्यायीं । स्वामीची चरित्रलीला बरवी ॥
लिहिण्या मति द्यावी ! नित्यानंदपदीं प्रार्थना असे ॥ ४४ ॥

॥ इति श्री नित्यानंद लीलामृते द्वितियाध्याय समाप्तः ॥

॥ ओवी संख्या ॥ ४४ ॥

---

## ॥ अध्याय तिसरा ॥

जय जयाजी नित्यानंदा । आनंदकंदा परमानंदा ॥
सगुणरूपी गोविंदा । तुझी लीला वर्णू कैशी ॥ १ ॥
साखरेची सांगण्या गोडी । आणिक साखर घ्यावी तोंडी ॥
तैशी नित्यानंदलीला आवडी । भक्तजन प्रेमें वाचती ॥ २ ॥
एके समयीं रेल्वेतून । प्रवास करिती स्वामी जाण ॥
तिकीट नाहीं ऐसे देखून । त्यांसी खाली उतरविलें ॥ ३ ॥
नीलेश्वर स्टेशनाची कथा । बाबासी खाली उतरवितां ॥
गाडी स्थिर जाहली तेथ । कांही केल्या हालेचिना ॥ ४ ॥
बाबा होते ध्यानस्थ । अधिकारी जाहले त्रस्त ॥
गाडी चालेना म्हणुनी दुःखित । त्यांसी उपाय नसेची ॥ ५ ॥
तयांसी आली कल्पना । बाबांच्या धरीलें चरणां ॥
सद्गुरुसी जाता शरण । गाडी आपोआप चालली ॥ ६ ॥
उच्चिला नामें ग्रामांत । स्वामी होते संचरत ॥
एक स्त्री अति दुःखित । होती बालकें मरताती ॥ ७ ॥

ऐकूनी तिची व्यथा । सद्गुरु उपाय करिती तेथ ॥
स्तन पिळूनी विष काढीता । बालकें वाचूं लागली ॥ ८ ॥
बरीच वर्षे वृक्षावरी । बाबा बसती वरचेवरी ॥
सर्व रोग दूर करण्यापरी । वृक्षाचीं पर्णे देती ॥ ९ ॥
जे लाधती प्रसाद पर्ण । त्यांचें पूर्ण मनोकामन ॥
सद्गुरुचा लागता वरदहस्त । काय उणें तयांसी ॥ १० ॥
असतां मुलकी ग्रामांत । अन्नदान केलें बहुत ॥
जवळी नसता धन निश्चित । अन्न संतर्पण केलें ॥ ११ ॥
तया ग्रामा भितर । एक मांत्रिक असें थोर ॥
जारण मारण करी वरचेवर । दुष्ट नीच असे ॥ १२ ॥
एके समयीं सद्गुरु लागून । दिधला तंबाखू मंत्रून ॥
खातां स्वामी तंबाखू जाण । इहलोक सोडतील ॥ १३ ॥
परंतु गुरु सेवितां तंबाकूस । पोटशूळ झाला मांत्रिकास ॥
वेदना अतीव जाहल्या त्यास । भूमिवरी लोळतसे ॥ १४ ॥
मनीं होती दुष्ट वासना । स्वामीसी छळीलें जाणा ॥
परंतु स्वामीनी त्यासी जाणा । यमपुरासीं पाठविलें ॥ १५ ॥
एक पंडित मलबारी । बांधिल्या चिंध्या हातावरी ॥


अग्नि प्रदिप्त करूनी । बाबांसी छळीतसे ॥ १६ ॥
परंतु जाहला चमत्कार । जैसा अग्नि झाला कठोर ॥
त्याचे शरीरीं दाह फार । मृत होऊनी पडला भूवरीं ॥ १७ ॥
नेत्रावती नदीचे तीरीं । गुरु येती वंटवाळ ग्रामीं ॥
वृक्षावरी ग्रामा बाहेरी । बसुनी प्रसाद पर्णे देती ॥ १८ ॥
नाना जाती नाना व्यथा । सद्गुरुसी शरण जाता ॥
वृक्षाची पर्णे हातीं देता । व्याधी त्यांची पळतसे ॥ १९ ॥
गुरु निंदक होते काहीं । शेणमाती उडविती देहीं ॥
गुरुसी छळीती ठायीं ठायीं । त्यांसी यमपूर निश्चिती ॥ २० ॥
एके दिनीं चमत्कार झाला । स्वामी गेले पैलतीराला ॥
नेत्रावतीस महापूर आला । मानव पशुही घाबरले ॥ २१ ॥
म्हणती आम्ही स्वामीसी छळीलें । म्हणुनी अरिष्ट ओढवले ॥
शोधूं जाता बाबा प्रगटले । एकाएकीं ग्रामांत ॥ २२ ॥
नदीसी गुरुचरण लागतां । शांत जाहलें पाणी आतां ॥
संकट हरूनी महापूर जातां । श्रीगुरुसी शरण गेले ॥ २३ ॥
वसतां उडपी ग्रामांत । एक चमत्कार दाविला तेथ ॥
धूळ फेकिता यात्रा रथांत । सुवर्ण रौप्य मुद्रा जाहल्या ॥ २४ ॥

करितां भारत संचार । मुंबईसी आले गुरुवर ॥
कधि कधि चौपाटीवर । वाळवंटीं बैसती ॥ २५ ॥
नव्हती कुणासी कल्पना । साक्षात् असे दत्तराणा ॥
सहज येती जे दर्शना । उद्धार तयांचा केला ॥ २६ ॥
बाबांचा एक भक्त । नाम सीताराम होत ॥
गुरुसी मानीं पूज्य बहुत । मनोभावें सेवाकरी ॥ २७ ॥
एके ठायीं नव्हते स्थिर । नित्य करिती संचार ॥
भक्तजन वारंवार । दर्शनासी बहु उत्सुक ॥ २८ ॥
एकोणीसशें छत्तीस पर्यंत । गुरुदेवानी केली यात्रा बहुत ॥
कांचनगड मंगळूर प्रांत । काशी विश्वेश्वर यात्रा केली ॥ २९ ॥
वज्रेश्वरीचा परिसर । अरण्य होते घनघोर ।
स्वामी वसती एकांतीं स्थिर । अकलोली ग्रामीं राहीलें ॥ ३० ॥
मुंबईस स्वामी येती । कुर्ल्याला काही काळ राहती ॥
कण्हेरी गुंफेत वसती । काहीं काळ केली असे ॥ ३१ ॥
खाडे उपनामे एक भक्त । दर्शनासी आले कुर्ल्यात ॥
जनानंद स्वामी प्रेरणाकरित । म्हणुनी दर्शना आले ॥ ३२ ॥
येतां दिपवाळी सण । त्यांचे गृहीं गेले आपण ॥
खरोखर भाग्यवान । जया सन्निध भोजन केलें ॥ ३३ ॥

प्रथम राहिले अकलोली । धर्मशाळा बांधली ॥
त्यानंतर गुरुमाऊली । वज्रेश्वरींत राहिली ॥ ३४ ॥
नाथमंदीराचा जीर्णोद्धार । रचिली धर्मशाळा विहीर ॥
दवाखाना आणि मंदिर । वज्रेश्वरीसी बांधिलें ॥ ३५ ॥
प्रगटले गणेशपुरीं । अरण्य होते घोरी ॥
व्याघ्र सर्प संचार करी । नव्हती वस्ती तेथें ॥ ३६ ॥
एका तळ्याकाठीं । वास कुंडावर करती ।
भक्तासाठीं गणेशपुरीं । धर्मशाळा बांधिली ॥ ३७ ॥
गणेशपुरीत येण्याला । मार्ग नव्हता चांगला ॥
जंगला माजीं त्यावेळा । मार्ग उत्तम रचियेला ॥ ३८ ॥
स्वामीचे चरण लागता । वसली गणेशपुरी आतां ॥
क्षेत्रासी आली महानता । सद्गुरु कृपा प्रसादें ॥ ३९ ॥
जे जन पाहती गणेशपुर । त्यांसी मिळे पुण्य थोर ॥
श्री नित्यानंद स्वामी थोर । दत्तावतार जाहले ॥ ४० ॥
आतां पुढील अध्यायांत । वर्णिला वज्रेश्वरी वृत्तांत ॥
कथा आहे पुराणांत । नवनाथ ग्रंथीं कथा असे ॥ ४१ ॥

॥ इति श्री नित्यानंद लीलामृते तृतियाध्याय समाप्तः ॥

॥ ओवी संख्या ॥ ४१ ॥



॥ श्री वज्रेश्वरी देवी ॥

# ॥ अध्याय चवथा ॥

आतां वर्णू वज्रेश्वरीक्षेत्र । स्वामींनीं केलें पवित्र ॥
शक्ति पीठ असे श्रेष्ठ । पुण्यभूमि बरवी असे ॥ १ ॥
पुराणांतील यज्ञस्थळ । पूर्व दिशे वाहे तेजसेंचें जळ ॥
स्वामी राहतीं कांही काळ । वज्रेश्वरी सन्निध ॥ २ ॥
आतां वर्णू क्षेत्र महिमा । त्यासी नसे उपमा ।
महात्म्य वाढविण्या याची धामा । नित्यानंद राहिले ॥ ३ ॥
याचि वज्रेश्वरी समीप । अकलोली कुंडें उष्ण आप ॥
स्वामी राहती वसतीस । पुण्यभूमि पुरातन ॥ ४ ॥
तानसा नदीचे सामोरी । मंदाग्नि पर्वत दिसे वरी ॥
अकलज ग्रामीं नदीचे तीरीं । उष्ण जल कुंडे असती ॥ ५ ॥
या मंदाग्नि पर्वतीं । ऋषि असती तपश्चर्ये प्रती ॥
प्रत्यक्ष येता स्नानाप्रती । उष्ण कुंडांत दिसताती ॥ ६ ॥
स्वामी म्हणती जनांसी । तपस्वी येती स्नानासी ॥
या मंदाग्नि पर्वतासी । तपानुष्ठान ते करिती ॥ ७ ॥

येथील कथा गहन । वसिष्ठ ऋषि महान ॥
यज्ञ केला थोर जाण । ऋषिदेवता समवेत ॥ ८ ॥
गणेशादी सकल देवता ; पाचारिल्या यज्ञाकरितां ॥
उष्ण कुंडे निर्मितां । नामें तयांची राहिलीं ॥ ९ ॥
अग्नि कुंड सूर्य कुंड । चंद्र कुंड वायु कुंड ॥
अत्रि अनुसुया नामें कुंड । दत्त कुंड असे येथें ॥ १० ॥
अनेक परी देवते प्रती । उष्ण कुंडें प्रख्याती ॥
जाहली भूमीची ख्याती । उष्ण जलाशयामुळें ॥ ११ ॥
तीनशें साठ उष्ण तीर्थें । निर्मिलीं यज्ञकार्यार्थें ॥
क्वचित राहिली गुप्तार्थें । मुख्य मुख्य राहिलीं ॥ १२ ॥
या कलियुगाभीतरीं । पाप करिती अघोरी ॥
स्नान करितां तीर्थां भीतरी । पापा वेगळा होतसे ॥ १३ ॥
आतां प्रार्थू वज्रेश्वरीसी । राहिली या भूमीसी ॥
पुराण कथा आहे सुरसी । वसिष्ठ मुनी प्रख्यात ॥ १४ ॥
यज्ञ करण्या झाला तत्पर । पाचारिले मुनिसुरवर ॥
देवेंद्राचे मनीं कोप थोर । नाना परी विघ्नें करी ॥ १५ ॥
देवेंद्र जाहला कोपायमान । जल घेतले शोषून ॥
वसिष्ठे दर्भबाण करून । बाणगंगा निर्मिली ॥ १६ ॥

गणेशपुरी पासून । चार मैलांवरी असे स्थान ॥
उत्तम जळ निर्मळ । वसिष्ठाची खूण असे ॥ १७ ॥
इंद्र जाहला अग्नि समान । वसिष्ठावरी सोडी वज्र महान ॥
पार्वतीनें गिळीलें तत्क्षण । भक्त संकटी रक्षावया ॥ १८ ॥
गिरीजेनें वज्र गिळीता । देवेंद्रासी ये बळहीनता ॥
शरण आला उमेपुढतां । माते वज्र देई मज ॥ १९ ॥
धरिले उमेचे चरण । देवी तुज आलो शरण ॥
मी आतां हीनदीन । तव प्रार्थना करितसे ॥ २० ॥
म्हणे पार्वती इंद्रासी । जा शरण वसिष्ठासी ॥
देवेंद्र विनवी तयासी । वज्र परत मिळविलें ॥ २१ ॥
धन्य धन्य उमासती । देवेंद्रासी झाली वज्र प्राप्ती ॥
अखंड राहिली या स्थानांती । वज्रेश्वरी नाम पावली ॥ २२ ॥
साक्षात् अंबामाऊली । करी कृपेची साऊली ॥
भक्त जनांसी पावली । संकटीं प्रार्थना करिताती ॥ २३ ॥
वज्रेश्वरीची निर्माण कथा । पुराणातील आहे कथा ॥
मंदिर दिसे भव्य आतां । त्याचा इतिहास सांगतो ॥ २४ ॥
पूर्वीं नव्हते भव्य मंदिर । केवळ एक देवता स्थान ॥
मूर्ति नव्हत्या तेथें जाण । स्थापन केल्या पेशव्यानीं ॥ २५ ॥

नव्हता ग्राम विस्तार । होतें तृण जंगल फार ॥
वसती नव्हती चहूंफेर । श्री नित्यानंदामुळें वाढली ॥ २६ ॥
चिमाजीअप्पा पेशवे थोर । जाहले फिरंग्यावरी स्वार ॥
वसईचा किल्ला घोर । जिंकण्या निघाले तेधवां ॥ २७ ॥
राहिले वज्रेश्वरी जवळी । भेटला साधु त्या स्थळी ॥
वज्रेश्वरीची माय माऊली । पेशव्यांसी दाविली ॥ २८ ॥
चिमाजी अप्पा दर्शना वेळीं । देवीची प्रार्थना केली ॥
विजयीं जाहलो युद्धमेळीं । भव्य मंदिरीं स्थापिन ॥ २९ ॥
देवी पावली नवसास । विजयी झाले युद्धांत ॥
मंदिर भव्य बांधून येथ । आईचा नवस फेडिला ॥ ३० ॥
भव्य प्राकार राऊळासी । बुरुज बांधिले गडासरसी ॥
उंच पायऱ्या रचिला त्यासी । उत्तम शोभा दिसतसे ॥ ३१ ॥
मंदिर रचना जाहल्यावर । दृष्टांत दिधला सत्वर ॥
अकलोली ग्रामीं नदीभीतर । तीन मूर्ति सांपडल्या ॥ ३२ ॥
कालिका रेणुका वज्रेश्वरी । स्थापन केल्या स्थानावरी ॥
साक्षात् उभ्या आजवरी । भक्तजनां वरदेती ॥ ३३ ॥
वज्रेश्वरीच्या पश्चिम दिशे । गोधडे बुवाची समाधी असे ॥
साधु थोर रहातसे । वज्रेश्वरी सन्निध ॥ ३४ ॥

त्यांचे एक समकालिन । शंकरगिरी बाबा जाण ॥
दोघे असती भक्त महान । वज्रेश्वरीसी सेविती ॥ ३५ ॥
गोधडे बाबा आणि शंकरगिरी । खेळत होते माते समोरी ॥
एकाएकीं अंबेच्या वस्त्रातुनी । पाणी वाहूं लागले ॥ ३६ ॥
दोघे विचारती देवीस । कसा भिजला तुझा हात ॥
म्हणे नको विचारू मात । परिते नायकती दोघे ॥ ३७ ॥
वारंवार विचारतां । गोधडे बुवास म्हणे मात ॥
भक्ताची नाव जळीं बुडता । उचलली मी वरचेवरी ॥ ३८ ॥
माय वज्रेश्वरी माऊली । सद्भक्तांसी साऊली ॥
भक्तांवरी कृपा केली । मनोभावें पूजिती तयां ॥ ३९ ॥
वज्रेश्वरी दर्शनाचे वेळ । तीन वेण्या तीन नारळ ॥
खण आणि पुष्पहार । अर्पूनी पूजा करावी ॥ ४० ॥
रेणुका कालिका वज्रामाता । साक्षात् प्रगटुनी बैसत ॥
त्या ग्रामीचें नाव आतां । वज्रेश्वरी जाहले ॥ ४१ ॥
गोधडे बुवा आईचा भक्त । जिवंत समाधी येथ घेत ॥
राहिले चिरंतर येथ । पश्चिम टेकडीवरी ॥ ४२ ॥
प्रथम वज्रेश्वरीचें दर्शन । पहावें गोधडे समाधीस्थान ॥

मनोभावें करूनी नमन । आशिर्वाद मागावा ॥ ४३ ॥
वज्रेश्वरीच्या पायथ्याशी । स्थापना आहे पादुकांची ॥
गोरख मच्छिंद्रनाथाची । खूण येथें राहिली ॥ ४४ ॥
कथा आहे नवनाथीं । नाथ येती वज्रेश्वरीसी ॥
उष्ण कुंडे निर्मिली भवतीं । वज्रेश्वरी पुण्यभूमि ॥ ४५ ॥
स्वामी आल्यानंतर । बराच केला जीर्णोद्धार ॥
श्रीनाथ पादुकावर । नाथ मंदिर बांधिलें ॥ ४६ ॥
वज्रेश्वरी पुण्यभूमि । बाबांची जाहली कर्मभूमि ॥
गणेशपुरीं राहुनी आश्रमीं । भक्त जनांसी उद्धरिलें ॥ ४७ ॥
आतां वर्णूं गणेशपुरी । आहे दुसरी पंढरी ॥
तेजसा नदीचे तीरीं । क्षेत्र थोर वसले ॥ ४८ ॥
यापुढील चरित्र कथा । पुढील अध्यायीं वाचिता ॥
श्रीनित्यानंद लीलामृता । अवीट गोडी येईल ॥ ४९ ॥
पुढील अध्यायीं दत्तमूर्ति । प्रगटती गणेशपुरीत ॥
श्री नित्यानंद नगरी येथ । स्वसामर्थे स्थापिली ॥ ५० ॥

॥ इति श्री नित्यानंद लीलामृते चतुर्थ अध्याय समाप्तः ॥

॥ ओवी संख्या ॥ ५० ॥



॥ श्री भद्रकाली देवी ॥

# ॥ अध्याय पांचवा ॥

गणेशपुरी क्षेत्र महान । बाबा येण्याचें कारण ॥
भूमिचे फेडण्या ऋण । श्री नित्यानंद राहिले ॥ १ ॥
गणेशपुर आहे पंढरी । सद्भक्त करिती वारी ॥
नित्यानंद समाधीवरी । प्रत्यक्ष पांडुरंग दिसतसे ॥ २ ॥
पूर्वी अरण्य होते घोर । व्याघ्र सर्प करिती संचार ॥
एक शिवालय भीमेश्वर । नदी समीप वसतसे ॥ ३ ॥
त्या शिवालया समोरीं । उष्ण जल वाहे भूमीवरी ॥
घनघोर अरण्याभीतरीं । सर्प संचारती गाभारीं ॥ ४ ॥
भीमेश्वर पश्चिम बाजूस । वृक्षाखाली केला वास ॥
स्वामिंनी केला निवास । एकांत स्थळ देखुनिया ॥ ५ ॥
नव्हती कोणासी कल्पना । राहे साक्षात् दत्तराणा ।
सहज दावुनी चमत्कारांना । भक्ताभिमानी राहिला ॥ ६ ॥
बाबा येथें आल्यावर । जाहली येथें वस्ती फार ॥
भक्तासाठीं कुंडावर । धर्मशाळा बांधिली ॥ ७ ॥
मनीं धरावी शुद्ध भावना । उपदेश करिती जनां ॥

वज्रेश्वरीचें घेऊनी दर्शन । भीमेश्वर कुंडी स्नान ॥ ८ ॥
या गणेशपुरीसी । स्वामीनी स्थापिली भद्रकाळीसी ॥
सुरस कथा आहे तीसी । लीलामृतीं बोधीली ॥ ९ ॥
स्वामी गोकर्णाहुनी येती । भद्रकाळी आली संगती ॥
स्वामीच्या संगती गणेशपुरी । भद्रकाळी गुप्त आली ॥ १० ॥
नव्हते तिला कोठे स्थान । वृक्षावरी ठेविलें प्रस्थान ॥
वीस वर्षांनंतर जाण । मंदिराप्रती स्थापिलें ॥ ११ ॥
ग्राम पूर्व भागेसी । स्वामीनी बांधिलें मंदिरासी ॥
भोपी पुजारी चरणासी । निरंतर ठेविला ॥ १२ ॥
भीमेश्वर कुंडी स्नान करून । घ्यावे भद्रकाली दर्शन ॥
खण नारळाने ओटी भरून । वरप्रसाद मागावा ॥ १३ ॥
येतां गणेशपुरी क्षेत्रासी । प्रथम दर्शन भीमेश्वरासी ।
नित्यानंद स्वामी चरणांशी । षोडशोपचारें पूजावें ॥ १४ ॥
मग घ्यावे श्रीकृष्ण दर्शन । योगेश्वर महान ॥
भद्रकाळीसी पूजुन । अनुसुया कुंडीं स्नान करा ॥ १५ ॥
भीमेश्वराचे गाभारीं । गुप्त गंगा वाहे निरंतरी ॥
ईश्वराचे जटे तुनीं । अखंड जल झरतसे ॥ १६ ॥
तीर्थ आहे बरवे । प्राशन करितां पाप दुरावे ॥

जेथ जेथे थेंब विसावे । लिंगोद्भव जाहला असे ॥ १७ ॥
ऐसी लिंगें अपार । गाभाऱ्यांत चहूंफेर ॥
गुप्त गंगा त्यांचेवर । अभिषेक करीतसे ॥ १८ ॥
पाहुनिया तीर्थाची थोरी । स्वामी राहिले गणेशपुरीं ॥
दीन गरीब बालकांवरी । अत्यंत प्रीती मनीं असे ॥ १९ ॥
येथें बांधिल्या धर्मशाळा । बालकांसी पाठशाळा ॥
अन्नदान देण्या बाळांना । बाल भोजन गृह बांधिलें ॥ २० ॥
अनेक जाती नाना पंथ । नित्य दर्शना येत ॥
आशिर्वाद देऊनी तया प्रत । दुःख दैन्य दूर केलें ॥ २१ ॥
गणेशपुरी क्षेत्रात । अनेक भक्ता दाविली प्रचीत ॥
नाना चमत्कार येथ । सहजपणें दाविती ॥ २२ ॥
मनीं धरूनी दर्शनाचा हेत । पागलबाबा आले येथ ॥
मनोभावे करुनी दंडवत । स्वामी सामोरे बैसती ॥ २३ ॥
त्या समयीं तया प्रती । स्वामी उपदेश करिती ॥
समाधी होईल या क्षेत्रीं । संकल्प मनीं योजिला ॥ २४ ॥
ऐकूनी स्वामींचे बोल । विचार करती वेळोवेळ ॥
नाहीं येथें आपुले स्थळ । कैसी समाधी होणार ॥ २५ ॥
एका स्त्रीसी झाली प्रेरणा । दान दिली भूमी जाणा ॥

त्या भूमींत आजच्या क्षणां । पागलबुवा समाधी असे ॥ २६ ॥
पागल बाबांचा एक शिष्य । रामभाऊ मढेकर ज्ञात ॥
सद्‌गुरु सेवेचें घेऊनी व्रत । निष्काम सेवा करीतसे ॥ २७ ॥
आगाशीसी असते वेळीं । आले स्वामी दर्शनासी ॥
स्वस्त्री आणि पुत्रासी । दर्शनाप्रती आणिले ॥ २८ ॥
दोन वर्षांचा त्यांचा सुत । पडला उष्ण कुंडात ॥
पाणी जाऊनी पोटांत । निःश्चेष्ट प्रेतवत जाहला ॥ २९ ॥
आक्रोश करिती मातापिता । सकल भयाभीत होता ॥
स्वामी सामोरें बालक नेता । तयाशी उचलीले ॥ ३० ॥
पिता म्हणे बाबांसी । भक्ति धरुनी दर्शनासी ॥
येता मृत्यु बालकासी । काय दुर्भाग्य आमुचें ॥ ३१ ॥
स्वामी हंसती ते वेळां । कृपा दृष्टी पाहती बाळा ॥
अरिष्ट नाही आले बाळा । प्राण शरीरीं दिसतसे ॥ ३२ ॥
यासी न्यावे गृहासी । उष्ण पिष्ट बांधा देहासी ॥
चेतना येऊनी देहासी । पुत्र सावध होईल ॥ ३३ ॥
स्वामी साक्षात् शंकर । दया करुणेचे सागर ॥
मार्कंडेयासी येता काळ । यमपाशातुन सोडविला ॥ ३४ ॥
तैसा राजेंद्र बालकासी । येता काळ ग्रासावयासी ॥

कृपा दृष्टीनें पाहून त्यासी । नित्यानंद प्रभु वाचविती ॥ ३५ ॥
बंधु बाळ कृष्णासी । दृष्टांत जाहला अक्कलकोटासी ॥
यावे गणेशपुरीसी । साक्षात् दत्त भेटेल ॥ ३६ ॥
दृष्टांत होता बाळकृष्णासी । आला गणेशपुरीसी ॥
अक्कलकोट स्वामी रूप त्यासी । श्री नित्यानंद दाविती ॥ ३७ ॥
राहुनी गुरुचरणापाशी । सेवा करी मनोभावेसी ॥
गीतें आरत्या रचुनी । नित्य पूजा करितसे ॥ ३८ ॥
स्वामींच्या समाधी नंतर । पूजेसी नेमिलें सत्वर ॥
त्रिकाळ आरती अभिषेक । स्वामी सेवा करीतसे ॥ ३९ ॥
चरित्रकाराचे विवाह क्षणा । एका स्त्रीसी दिली प्रेरणा ॥
सालंकृत कन्या दाना । स्वामींनी दृष्टांत दिधला ॥ ४० ॥
एक स्त्री बाबांची भक्त । मुंबापुरीहून दर्शनासी येत ॥
घनघोर पर्जन्य रस्त्यांत । परी चमत्कार देखिला ॥ ४१ ॥
जोवरी होती गाडीत । घनघोर वर्षा होत ॥
परंतु चालता मार्गांत । पर्जन्य थांबे तत्क्षणीं ॥ ४२ ॥
धन्य धन्य गणेशपुरी । भक्तजनांसी पंढरी ॥
नित्यानंद बाबा विटेवरी । प्रत्यक्ष पांडुरंग असे ॥ ४३ ॥
एक पाटील वारकरी । नित्य पंढरी वारी करी ॥

एक वेळ आला गणेशपुरी । नित्यानंद दर्शना ॥ ४४ ॥
बाबा म्हणती पाटलास । कासया जातो पंढरीस ॥
इथेची पाहे पांडुरंगास । श्रम वृथा करितोसी ॥ ४५ ॥
इतुके स्वामी बोलतां । कृपा दृष्टीनें पाहतां ॥
बाबांचे ठायीं पाटील आतां । प्रत्यक्ष पांडुरंग पाहतसे ॥ ४६ ॥
पाटील जाहला दंग । प्रत्यक्ष दिसे पांडुरंग ॥
नमन करूनी साष्टांग । मनोभावें पूजीतसे ॥ ४७ ॥
स्वामी असतां गणेशपुरीस । अनेक रूपं दाविती भक्तास ॥
दत्त कृष्णरूप कित्येकास । शिवरूपही दाविलें ॥ ४८ ॥
एक भैया जगदेव । केळ्यांचा करी व्यापार ॥
गुरुवारीं स्वामी दर्शन । करण्या नेमें येतसे ॥ ४९ ॥
त्यासी मनीं चिंता फार । लेक विवाहीसी उपवर ॥
कैसा विवाह होणार । धनाचा कांहीं लेश नसे ॥ ५० ॥
स्वामी म्हणती तयासी । किती धन आहे तुजपाशी ॥
ठेव सामोरें मजपाशी । इच्छा पूर्ण करीन ॥ ५१ ॥
स्वामी स्पर्शती द्रव्याशी । दोनचार रुपये तयापाशी ॥
करावे कन्यादानासी । अखंड द्रव्य लाभेल ॥ ५२ ॥
मनीं धरोनी विश्वास । नेमिलें योग्य वरास ॥

सहस्र संख्या द्रव्यास । स्वामी कृपे लाधले ॥ ५३ ॥
जामात आणि कन्येस । आणिले गुरु दर्शनास ॥
पुन्हा प्रश्न केला त्यास । द्रव्य खिशांत किती असे ॥ ५४ ॥
त्यासी आश्चर्य वाटले । पूर्वी इतुकेची धन मिळालें ॥
स्वामींच्या आशिर्वादे । सहस्र संख्या धन लाभले ॥ ५५ ॥
वज्रेश्वरीचा ब्राह्मण । प्रत्यक्ष पाहे आश्चर्य जाण ॥
रस्ता बांधणीच्या क्षणा । । चमत्कार देखिला ॥ ५६ ॥
मुसळधार वर्षा होती । कंबळी मजुरांचे डोईवरती ॥
परंतु स्वामी जवळी नव्हती । छत्री अथवा कांबळ ॥ ५७ ॥
पर्जन्यधारा पडती क्षिती । बाबांसी नव्हती भ्रांती ॥
कारण त्यांचे शरीरावरती । एकही बिंदू पडेचिना ॥ ५८ ॥
हे नव्हेची मानवरूप । साक्षात् ब्रह्मा विष्णु महेश ॥
लीला दावी बहुरूप । कृष्ण योगेश्वरा परी ॥ ५९ ॥
ऐसी वर्णितां बहुलीला । ग्रंथ विस्तार पावला ॥
मनीं शुद्ध भाव असे त्याला । नाना चमत्कार दाविती ॥ ६० ॥

॥ इति श्री नित्यानंद लीलामृते पंचमोध्याय समाप्तः ॥

॥ ओवी संख्या ॥ ६० ॥

## ॥ अध्याय सहावा ॥

वर्णितां लीला बाबांची । जळती पापें जन्माची ॥
भक्तियुक्त वाचणाऱ्यांची । इच्छा पूर्ण होतसे ॥ १ ॥
बाबा बसती कैलासात । दर्शन देती भाविकास ॥
जैसे भावें प्रार्थित । तैसा अनुभव दिधला ॥ २ ॥
कोणी मागे द्रव्य । त्यासी दिधला आशिर्वाद ॥
व्यापार उदीम करून । अखंड लक्ष्मी लाभले ॥ ३ ॥
कोणी मनी उद्विग्न । संततिसाठीं मनीं खिन्न ॥
बाबांचा आर्शिवाद घेऊन । पुत्र संतान लाभले ॥ ४ ॥
बाबा सामोरे बैसता । जाणती त्यांची व्यथा ।
सद्‌गुरु मुखें आर्शिवाद घेता । व्याधी पळे तयाची ॥ ५ ॥
गुरुवारी आणि रविवारी । असंख्य जन यात्रा करी ॥
स्वामींच्या पुण्य दर्शनासी । तिष्ठत होते मार्गात ॥ ६ ॥
यांची जाहली बहु ख्याती । नाना देशीचे जन येती ॥
कृपा दृष्टीनें स्वामी पाहती । धन्य त्यांचे जीवन ॥ ७ ॥

मनीं धरोनी भावना । जो आला गुरुदर्शना ॥
त्याची पूर्ण मनोकामना । गुरु कृपे होतसे ॥ ८ ॥
नारळ केळ्यांचा सुकाळ । वस्त्रप्रावरणाचा मेळ ॥
दान करिती वेळोवेळ । द्रव्यही देती किती एका ॥ ९ ॥
पिशाच्च बाधेनें पीडीत । स्वामी सामोरे येतां ॥
त्यासी गुरुनी देखता । पिशाच्च पळे तात्काळ ॥ १० ॥
कोणासी होता पोटशूळ । कुणासी होती गंडमाळ ॥
कुणाचा ज्वर आणि विषार । स्वामीनीं दूर केला ॥ ११ ॥
जे पूजिती भक्तिनें । अन्न दान धनदानें ॥
अखंड लक्ष्मी त्यासी मिळे । आशिर्वाद स्वामींचा ॥ १२ ॥
नाना धर्म नाना जाती । स्वामी दर्शनासी येती ॥
भेदभाव कधी नसती । समदृष्टी पाहती सदा ॥ १३ ॥
फळे अथवा वस्त्र । प्रेमें भक्तासी देत ॥
जे लाभले प्रसाद । उद्धार त्यांचा जाहला ॥ १४ ॥
सन एकोणीसशें एकसष्ट । आषाढ वद्य द्वादशीस ॥
स्वामी जाहले समाधीस्त । लाखो भक्त दर्शना आले ॥ १५ ॥
कित्येकासी शोक अनावर । कित्येक झाले बेशुद्ध ॥
गणेशपुरीचे योगी सिद्ध । निजानंदी विनटले ॥ १६ ॥

भाविकांचा आला पूर । रौप्य मुद्रा पडल्या समाधीवर ॥
लाखो संख्या धन खर्चून । समाधी मंदिर बांधिलें ॥ १७ ॥
जरी नसती बाबा प्रत्यक्ष । गुरु पादुकांची असे साक्ष ॥
भावभक्तिने करीता अभिषेक । भक्त संकटीं पावती ॥ १८ ॥
भीमेश्वरा सन्निध । स्थापिले समाधी मंदिर ॥
सद्गुरुंची मूर्ति सुंदर । समाधीवरी स्थापिली ॥ १९ ॥
उष्ण कुंडी स्नान करून । नित्यानंदासी पूजून ॥
जे करीती अन्नदान । त्यासी लाभे धन संतती ॥ २० ॥
स्वामींचें गाता भजन । अथवा करिता प्रदक्षिणा ॥
संकटे टळे निश्चित जाणा । सत्य सत्य त्रिवाचा ॥ २१ ॥
या क्षेत्रीचें महिमान । शक्ती पीठ असे महान ॥
नित्यानंद दत्त जाण । उद्धार केला जनांचा ॥ २२ ॥
गुरुवारी अभिषेक करून । हार आणि वस्त्रें अर्पून ॥
जे जन करिती अन्नदान । मनोकामना पूर्ण करिती ॥ २३ ॥
व्याधी पीडींत असेल नर । वाचावें स्तोत्र त्रिवार ।
उष्ण कुंडी स्नान करून । नाम स्मरण करावें ॥ २४ ॥
जे जन करिती नित्यवारी । त्यासी नाहीं यमपुरी ॥
किंवा गुरुवारी यात्रा करी । त्यासी मुक्ती निश्चित ॥ २५ ॥

शुचिर्भूत होऊन । गुरु प्रतिमेसी पूजून ।
मनोभावें लीलामृत वाचून । गुरुसी नैवेद्य अर्पावा ॥ २६ ॥
संकट अथवा बंधन असतां । नित्य वाचावें लीलामृता ॥
नित्यानंद दत्त भक्तां । सदैव संकटी पावतो ॥ २७ ॥
ज्यासी असेल पुत्रकाम । सदैव वांचावे नित्य नेम ॥
बालगोपाळांसी अन्नदान । गणेशपुरीं करावे ॥ २८ ॥
दरिद्र्यासी धन संपत्ती । निपुत्रिकासी पुत्र लाभती ॥
श्रीगुरुचरणांची सेवा करिती । धन्य त्यांचे जीवन ॥ २९ ॥
येता गणेशपुरी यात्रेसी । प्रथम जावे अकलोलीसी ॥
स्नान उष्ण कुंडासी । करून रामेश्वर पूजावा ॥३० ॥
नंतर वज्रेश्वरी दर्शन । तीन वेण्या नारळ खण ॥
कालिका रेणुका वज्रेश्वरी पूजून । आशिर्वाद मागावा ॥ ३१ ॥
औदुंबरा तळीं दत्त पादुका । गोधडेबुवा समाधी अवलोका ॥
गोरक्ष मच्छिंद्र पादुका । नाथ मंदिरीं पूजाव्या ॥ ३२ ॥
नंतर यावें गणेशपुरीं । भीमेश्वर कुंडीं स्नान करा ॥

भीमेश्वरासी पूजावा । कृष्ण योगेश्वर दर्शन घ्यावें ॥ ३३ ॥
त्यानंतर श्रीगुरुसी । अभिषेक करावा चरणांसी ॥
वस्त्रहार अर्पुनी स्वामिसी । आशिर्वाद मागावा ॥ ३४ ॥
पहावे भद्रकाळी मंदिर । यथाशक्ति करूनी पूजन ॥
बालकें साधुसी अन्नदान । यथाशक्ति करावे ॥ ३५ ॥
जे जन करिती प्रदक्षिणा । त्यासी दैन्य नसे जाणा ॥
नित्यानंद दत्त राणा । पूर्ण कृपा करितसे ॥ ३६ ॥
नित्यानंद लीला अपार । स्वामी करुणा सागर ॥
ज्यांची श्रद्धा अपार । त्यासी मोक्ष नसे दूर ॥ ३७ ॥
ध्यावी नित्यानंद मूर्ति । सदैव पूजा आरती ॥
करणाऱ्यासी सद्गति । गुरुकृपे लाभेल ॥ ३८ ॥
नित्यानंद लीला सागर । आत असे अमृत थोर ॥
वासुदेव विनवी वारंवार । लीलामृत प्राशिण्या ॥ ३९ ॥
आता लिहिली निश्चिती । लीलामृताची फलश्रुति ॥
मनोभावें ग्रंथ वाचिती । सकल बंधन तुटे जाणा ॥ ४० ॥
सप्ताह करण्याचा नेम । दिनशुद्धि बरवी पाहून ॥

शुचिर्भूत होऊन । गुरु पूजन करावें ॥ ४१ ॥
पूर्वोत्तर मुख करून । सदैव वाचावे लीलामृत ॥
उपहार करुनी अल्प । एकभुक्त रहावे ॥ ४२ ॥
दीप असावे तेजायमान । धूप चंदन अर्पून ॥
नित्य नैवेद्य अर्पून । पंचारती करावी ॥ ४३ ॥
मनोभावें करा प्रार्थना । नित्यानंद जप करा ॥
सप्ताह पारायण करणाऱ्यानां । गुरु कृपा होणार ॥ ४४ ॥
गुरुवारी समाप्ती करून । साधुसी द्यावे अन्नदान ॥
सकळ ऐश्वर्य लाभे जाण । गुरुप्रेरणे लिहितसे ॥ ४५ ॥
आतां नित्यानंदासी नमून । ग्रंथ करीतो पूर्ण ॥
शके अठराशे ब्याण्यवात । ग्रंथ रचना केली असे ॥ ४६ ॥
नित्यानंद सागर बरवा । आंत असे अमृत ठेवा ॥
उद्धार करण्या भक्तजना । लीलामृतीं प्राशिला ॥ ४७ ॥
नित्यानंद सद्गुरु दत्त । वारंवार करीतो दंडवत ॥
वासुदेवाचे हृदयीं स्थिर । गुरुमूर्ति राहिली ॥ ४८ ॥
होती पुण्याई बहुत । म्हणुनी गुरुकृपा हस्त ॥
लाधुनी वाचा पुनीत । दत्तकृपे ग्रंथ लिहिला ॥ ४९ ॥

जय जय श्री नित्यानंदा । आनंद कंदा गोविंदा ॥
श्री गुरुचरण सेवा सदा । वासुदेवासी लाभावी ॥ ५० ॥

॥ ॐ श्री सद्गुरु नित्यानंदायनमः ॥

॥ इति श्री नित्यानंद लीलामृते षष्ठ अध्याय समाप्तः ॥

॥ ओवी संख्या ॥ ५० ॥

॥ इति श्री नित्यानंद लीलामृत समाप्तम् ॥

॥ एकूण ओवी संख्या ३०१ ॥

# आरती श्री नित्यानंदाची

जय जय आरती नित्यानंदा । सगुणरूपी गोविंदा ॥ ध्रु ॥

प्रथम दत्तरूप घेसी । द्वितिय श्रीपाद होसी ॥
तृतिय नरहरी होसी । गाणगापुरी लीला दाविसी ॥ १ ॥

माणिक प्रभु तूं होसी । अक्कलकोट स्वामी होसी ॥
शिरडी साईनाथ होसी । कलियुगीं नित्यानंद बनसी ॥ २ ॥

ऐसी अनेकरूपें तूं घेसी । गणेशपुरी तूं वससी ॥
भक्तांची इच्छा पुरवीसी । बाळानां बहु आवडसी ॥ ३ ॥

जय जय आरती नित्यानंदा । सगुण रूपी गोविंदा ॥

☆

# — भजन —

नित्यानंद गुरु तुझ्या पादुका।
वंदिन मी माथा करावी कृपा गुरुनाथा ॥ धृ ॥

कुलदैवत गुरु तूं माझे।
अज्ञानाला ज्ञान तूं देसी।
दत्त गुरु ऐशी साक्ष पटविसी ॥ १ ॥

सर्व तीर्थं पवित्र करुनी।
गणेशपुरी तूं वससी।
सर्व जनांची इच्छा तूं पुरवीसी ॥ २ ॥

भक्तिस्तव तूं कष्ट सोशिले।
एकनाथा घरीं पाणी वाहिले।
ऐसे जनां तूं अनुभव दिधले ॥ ३ ॥

वांझेसी तूं पुत्रही देसी।
पिशाच्च बाधा नष्ट करिसी।
गुरुचरित्राची आठवण देसी ॥ ४ ॥

वंदिन मी माथा करावी कृपा गुरुनाथा...

REFBK-0022524



तुझे पायीं माझे भाळ । तूंच त्राता सर्वकाळ ॥
हेंचि देई नित्यानंदा । सद्गुरु माझे आई ॥

# ॥ नित्यानंददत्त ज्योतिष कार्यालय, गणेशपुरी.

आमचे कडे जन्म कुंडल्या तयार करुन मिळतील. तसेच जन्मकुंडली हस्त रेषेवरून भविष्य वर्तविण्यांत येईल. ग्रहपीडा पिशाच्चबाधा. णी भानमती चेटूक व इतर असाध्य रोगावर योग्य ते खात्रीलायक उपचार केले जातील. पीडा परिहारार्थ ताईत मिळेल. तसेच भृगु-संहिता या ज्योतीष ग्रंथावरून फल वर्तविले जाईल. भेटा अगर लिहा.

श्री वासुदेव महादेव म्हसकर
ज्योतिषी व हस्तसामुद्रिक,
मु. गणेशपुरी, पो. वज्रेश्वरी,
जि. ठाणे.



(प्रत) शाखा
क्र.
दा.क्र.
२२५२४